Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021)

With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## परिपत्रक

**विषय :– विद्यापीठाचे दुबार पदवीप्रमाणपत्र घेण्यासाठी विद्यार्थ्यांकडुन घ्यावयाचे प्रतिज्ञापत्रावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील अनुसूची–1 मधील अनुच्छेद–7 अन्वये आकारणी योग्य असलेले मुद्रांक शुल्क माफ केलेबाबत...**

विद्यापीठाच्या शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर कार्यक्षेत्र अंतर्गत असलेल्या कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हयातील विविध महाविद्यालयातून विविध अभ्यासक्रम पूर्ण केलेनंतर विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात पदवीप्रमाणपत्र सन्मानपुर्वक प्रदान करण्यात येते. विद्यापीठाकडून पदवीप्रमाणपत्र विद्यार्थ्यांना दिल्यानंतर काही विद्यार्थ्यांकडून पदवीप्रमाणपत्र गहाळ झालेस त्यांना दुबार पदवीप्रमाणपत्र विद्यापीठामार्फत देण्यात येते. त्यावेळी संबंधित विद्यार्थ्यांकडून डुप्लीकेट पदवी/पदविका प्रमाणपत्र मिळणेबाबतच्या अर्जासोबत रुपये 100/– च्या स्टॅम्पवर ॲफिडेव्हीट करुन घेतले जात होते.

तथापी महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभागाकडील अधिसूचना क्र. मुद्रांक 2004/1663/प्र.क्र. 436/म–1 दि. 01/07/2004 अन्वये शासनाने का र्यालयात शासकीय कार्यालये यांचेसमोर दाखल करावयाच्या इतर सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील अनुसूची–1 मधील अनुच्छेद–4 अन्वये आकारणी योग्य असलेले मुद्रांक शुल्क माफ केले आहे.

त्यानुसार यापुढे विद्यापीठाचे दुबार पदवीप्रमाणपत्रासाठी मागणी करताना विद्यार्थ्यांनी प्रतिज्ञापत्र स्टॅम्पवर ॲफिडेव्हीट/नोटरी न करुन घेता साध्या कागदावर ॲफिडेव्हीट/नोटरी करुन प्रतिज्ञापत्र विद्यापीठास सादर करावे.

संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

जा. क्र.:– परीक्षा/दीक्षांत विभाग/6071
दिनांक :– 17 DEC 2024

प्रति,
1) सर्व संलग्नीत महाविद्यालये यांना सदरचे परिपत्रक सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावे.